# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४


क्रमांकः शुनिप्रा/सूचना/१२७० /२०२५ दिनांक : २५/०८/२०२५

## सूचना

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/पालक/संबंधीत संस्था यांना प्रवेश शुल्क भरण्याबात सूचना.**

**संदर्भ : प्राधिकरण कार्यालयाची दि. ३१/०७/२०२५ रोजीची सूचना**

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण / विधी /कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी तसेचप्रवेश देणाऱ्या सस्था यांना महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २(ब) नूसार खालीलप्रमाणे तरतूद आहे -

"शुल्क" याचा अर्थ शुल्क म्हणून निश्चित करण्यात आलेली रक्कम, असा आहे आणि त्यामध्ये, शिकवणी शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क अथवा कोणत्याही अभ्यासानुवर्ती किंवा सह-अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांकरिता देय असलेली रक्कम, प्रयोगशाळा शुल्क, माहिती पुस्तिका शुल्क आणि विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली, अन्य कोणतीही रक्कम म्हणजेच एखाद्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेत एखाद्या व्यावसायिक पाठयक्रमाला प्रवेश दिलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून, कोणत्याही प्रयोजनासाठी अशा संस्थेला देय असलेली रक्कम-मग ती कोणत्याही नावाने संबोधली जाणारी आणि कोणत्याही रीतीने स्वीकारलेली असो- यांचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये, कोणत्याही वैकल्पिक वसतिगृह-निवासव्यवस्था, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क यांचा समावेश होणार नाही."

वरील प्रमाणे संबंधित संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भरलेल्या शुल्कामध्ये वरील बाबी समाविष्ठ आहे याची नोंद घ्यावी. तसेच प्रवेश देणाऱ्या संस्थांनी वरील सर्व बाबी शुल्कामध्ये आहेत याची खात्री करुन प्रवेशावेळी विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत नोंद घ्यावी.

Fees Regulating Authority
Maharashtra State

तसेच सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्यानंतरच Caution Money प्राधिकरणाच्या दि. ०९/१०/२०२४ रोजी निर्धारित करण्यात आलेल्या नियमावलीनुसार विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावे.

अ) उच्च व तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत येणारे अभ्यासक्रम :

| Sr.No. | Name of the Course | Upper limit prescribed (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Master of Engineering (M. Engg.) | 25,000/- |
| 2 | Bachelor of Engineering (B. Engg.) | 25,000/- |
| 3 | Master of Management Studies (MMS)/ Master of Business Administration (MBA) | 25,000/- |
| 4 | Master of Computer Application (MCA) | 25,000/- |
| 5 | Master of Pharmacy (M. Pharm) | 25,000/- |
| 6 | Bachelor of Pharmacy (B. Pharm) | 25,000/- |
| 7 | Pharm D | 25,000/- |
| 8 | Master of Architecture (M. Arch) | 25,000/- |
| 9 | Bachelor of Architecture (B.Arch) | 25,000/- |
| 10 | Master of Hotel Management and Catering Technology (M.HMCT) | 25,000/- |
| 11 | Bachelor of Hotel Management and Catering Technology (B.HMCT) | 25,000/- |
| 12 | Applied Arts | 25,000/- |
| 13 | Bachelor of Law - 3 Years (L.L.B.-3) | 5,000/- |
| 14 | Bachelor of Law - 5 Years (L.L.B.-5) | 5,000/- |
| 15 | Bachelor of Design (B.Des.) | 25,000/- |

ब) वैद्यकीय विभागा अंतर्गत येणारे अभ्यासक्रम :

| Sr.No. | Name of the Course | Upper limit prescribed (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Doctor of Medicine (M.D.) Master of Surgery (M.S.) | 50,000/- |
| 2 | Bachelor of Medicine/ Bachelor of Surgery (M.B.B.S.) | 50,000/- |
| 3 | Super Speciality (D.M./M.Ch.) | 50,000/- |
| 4 | Master of Dental Surgery (PG-Dental/ M.D.S.) | 40,000/- |
| 5 | Bachelor of Dental Surgery (B.D.S.) | 40,000/- |
| 6 | Master of Ayurved Medicine and Surgery (PG-Ayurved) | 25,000/- |
| 7 | Bachelor of Ayurved Medicine and Surgery (B.A.M.S.) | 25,000/- |

Fees Regulating Authority
Maharashtra State

| Sr.No. | Name of the Course | Upper limit prescribed (Rs.) |
|---|---|---|
| 8 | Master of Homeopathy Medicine and Surgery (PG- Homeopathy) | 25,000/- |
| 9 | Bachelor of Homeopathy Medicine and Surgery (B.H.M.S.) | 25,000/- |
| 10 | Bachelor of Unani Medicine and Surgery (B.U.M.S.) | 10,000/- |
| 11 | Master of Unani Medicine and Surgery (PG- Unani) | 10,000/- |
| 12 | Master of Physiotherapy (M.PTH.) | 20,000/- |
| 13 | Bachelor of Physiotherapy (B.PTH.) | 20,000/- |
| 14 | Master of Science in Nursing (M.Sc. Nursing) | 10,000/- |
| 15 | Bachelor of Science in Nursing (B.Sc. Nursing) | 10,000/- |
| 16 | Post Basic Science in Nursing (P.B.Sc. Nursing) | 10,000/- |

क) कृषी विभागा अंतर्गत येणारे अभ्यासक्रम :

| Sr.No. | Name of the Course | Upper limit prescribed (Rs.) |
|---|---|---|
| 1 | Agriculture Business Management (A.B.M) | 10,000/- |
| 2 | B.Tech Bio-Technology (B.I.O.T.) | 10,000/- |
| 3 | B.Sc. (Hons) Agriculture (B.Sc.A.) | 10,000/- |
| 4 | B.Sc. (Hons) Horticulture (B.S.C.H.) | 10,000/- |
| 5 | B.Tech Agricultural Engineering (B.Tech. Agri) | 10,000/- |
| 6 | B.Tech Food Technology (FOODT) | 10,000/- |

संबंधीत संस्थांनी वरील नमूद तरतूदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्याबाबत विद्यार्थी/पालक यांच्याकडून कोणतीही तक्रार प्राधिकरण कार्यालयास प्राप्त झाल्यास व तथ्य आढळल्यास अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई